ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January-June 2022- Vol. 11 No. 1

# शांतता शिक्षणासाठी बी. एड्. प्रशिक्षणार्थीच्या वर राबविण्यात आलेल्या उपक्रमांच्या विकासात्मक कार्याचा अभ्यास

**प्राचार्य डॉ. पांढरे विद्युलता ज्ञा.***
*उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय,* सोलापूर

**श्रीमती सुनिता जोगधनकर****
*पीएच.डी. संशोधक, सोलापूर विद्यापीठ*

***सारांश :-***
*आज धकाधकीच्या जीवनात प्रत्येक व्यक्तींचे स्वास्थ हरवले असून प्रत्येक व्यक्ती सतत ताणतणाव, दडपण, आजार इ. ने ग्रासला असून त्यापासून मुक्तता निर्माण होणे आवश्यक आहे. हे कार्य आज प्राथमिक शाळेपासून केले जात आहे. परंतू हे शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना प्रथम प्रशिक्षणातून योग्य परिपाठाचे शिक्षण देणे, अपेक्षित आहे. शास्त्रीय शिक्षणातून योग्य मूल्यांचा विकास याचे ज्ञान झाल्यास त्याची रुजवणूक ते विद्यार्थ्यांच्यामध्ये करतील हा दृष्टिकोन विचारात घेवून सदर लघुसंशोधन विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे.*

***मुख्यशब्द :-***
*परिपाठ, उपक्रम, विद्यार्थी, प्रशिक्षण*

**प्रास्ताविक :-**

आपण दैनंदिन कार्य करताना नित्यतेने काही कार्य करण्याचा आपला सराव झालेला असतो. ते काम नाही केले तर आपणांस कार्यपुर्ती न केल्याची सातत्याने जाणीव होते. आज दैनंदिन कार्यामध्ये प्रत्येक कामात वेग वाढला असून त्यामध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे व्यक्ती आपले मानसिक आणि शारिरीक स्वास्थ हरवून बसला आहे. कामाच्या ताणाने अनेक अनेक रोग बळावत असून त्याव्दारे व्यक्तीची हानी होत असलेली दिसून येत आहे. पुर्वीच्या काळात ह्या समस्या दिसून येत नसत/जाणवत नसत परंतु आजच्या विकासात्मक आणि प्रगतीच्या युगात प्रगतीकडे वाटचाल करताना ही समस्या उद्भवलेली दिसून येते. त्यामुळे शिक्षणात आज शांतता, शिक्षण देणे गरजेचे झाले आहे. त्यामध्ये दैनंदिन परिपाठ हा एक शांतता शिक्षणासाठी आवश्यक कार्य असलेले असून शालेय शिक्षणात याचा समावेश दिसून येतो. परंतु ह्या परिपाठ शिक्षणाचा अर्थ, गरज, महत्व तसेच परिपाठाचे विविध घटक यांचे सखोल ज्ञान बी.एड्. प्रशिक्षणात देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाव्दारे विकसित झालेल्या शिक्षणाने निश्चित बी.एड्. प्रशिक्षित विद्यार्थी शिक्षक झाल्यावर आपल्या विद्यार्थ्यांना त्याचे योग्य आणि शास्त्रशुध्द ज्ञान देईल. परिपाठ शिक्षणातून चांगला विद्यार्थी घडेल. जो ताणविरहीत, शांततेचे जीवन जगण्याचा प्रयत्न करेल. आजच्या स्पर्धात्मक युगात स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी मानसिक आणि शारिरीकदृष्ट्या सक्षम बनेल. ह्या सर्व बाबींचा सकारात्मक विचार करुन संशोधकाने प्रस्तुत लघुसंशोधन केले आहे.

**परिपाठाचा अर्थ :-**
**नित्य करावयाचा पाठ म्हणजे परिपाठ.**

**परिपाठाचे महत्त्व**
→ योग्य सवय
→ वैचारिक विकास
→ सहकार्य वृत्ती
→ सकारात्मक विचारांची निर्मिती

**परिपाठातील विविध घटक**

- → राष्ट्रगीत
- → प्रतिज्ञा
- → संविधान
- → दिनांक
- → वार
- → दिनविशेष
- → व्यक्तिविशेष
- → सुविचार
- → सामान्य ज्ञान
- → बोधकथा
- → बातम्या
- → प्रश्नमंजुषा
- → जो दिनांक पाढा
- → प्रार्थना
- → प्रसायदान
- → भान

**संशोधनाची गरज :-**

1. आज "मानसिक स्वास्थ" ह्या प्रश्नासंबंधी विविध प्रयत्नांमधील परिपाठ ह्या घटकांसाठी सदर संशोधनाची गरज आहे.
2. दैनंदिन परिपाठाव्दारे विकसित होऊ शकणाऱ्या मूल्यांच्या विकासासंबंधी अभ्यास करण्यासाठी सदर संशोधनाची गरज आहे.
3. परिपाठ उपक्रमांतून बी.एड् प्रशिक्षणार्थी तसेच इतर व्यक्तींना विविध उपक्रमांची शास्त्रशुध्द माहिती प्राप्त होण्यासाठी सदर संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाचे महत्व :-**

1. शिक्षणातून "शांतता शिक्षण" ह्या घटकांसाठी परिपाठ ह्या उपक्रमांच्या कार्यासंबंधी माहिती प्राप्त होण्यास मदत होईल.
2. परिपाठ उपक्रमांच्या व्दारे विकसित होणाऱ्या विविध मूल्यांची माहिती मिळण्यास मदत होईल.
3. परिपाठ उपक्रमांतून विविध माहितीचा विकास होण्यास मदत होईल.

**समस्या विधान :-**

शांतता शिक्षणासाठी बी.एड्. प्रशिक्षणार्थींच्या राबविण्यात आलेल्या परिपाठ उपक्रमाच्या विकासात्मक कार्याचा अभ्यास.

**संशोधन उद्दिष्ट्ये :-**

1. बी.एड् प्रशिक्षणार्थींसाठी परिपाठ उपक्रमाचे नियोजन अभ्यास करणे.
2. बी.एड्. प्रशिक्षणार्थींसाठी परिपाठ उपक्रमांअंतर्गत विविध उपक्रमासंबंधीच्या कार्यवाहीचा अभ्यास करणे.
3. बी.एड् प्रशिक्षणार्थींच्या परिपाठ उपक्रमांतून विकसित झालेल्या मूल्यांचा अभ्यास करणे.
4. बी.एड् प्रशिक्षणार्थींसाठी परिपाठ उपक्रमांअंतर्गत विविध उपक्रम सुचविणे.

**संशोधनाची व्याप्ती :-**

1. प्रस्तुत संशोधनासाठी उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर मधील प्रथम वर्षातील प्रशिक्षणार्थींचा अभ्यास करण्यात आला आहे.
2. प्रस्तुत संशोधनासाठी उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. प्रशिक्षणामधील परिपाठ ह्या प्रात्यक्षिक उपक्रमाचा अभ्यास केला आहे.

**संशोधनाची मर्यादा :-**

1. प्रस्तुत संशोधन हे उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर मधील प्रथम वर्षातील प्रशिक्षणार्थींच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. प्रशिक्षणातील परिपाठ ह्या प्रात्यक्षिक उपक्रमांपुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**संशोधन साधने :-**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली, निरीक्षण सूची आणि मुलाखत ह्या संशोधन साधनांचा वापर केला आहे. ह्यामध्ये विद्यार्थी/प्रशिक्षणार्थींना प्रश्नावली तसेच निरीक्षण सूचीचा वापर करण्यात आला आहे आणि परिपाठ विभाग प्रमुख यांची मुलाखतीव्दारे चर्चा करण्यात आली.

**संशोधन कार्यपध्दती :-**

प्रस्तुत संशोधन हे संपूर्ण महिन्याच्या परिपाठ कार्यक्रम ह्यावर करण्यात आले. त्यामध्ये परिपाठ विभागप्रमुख यांच्या नियोजनाचा अभ्यास करण्यात आला. तसेच संपूर्ण महिनाभर परिपाठ उपक्रमांचे प्रत्यक्ष सहभागी होऊन निरीक्षण करण्यात आले. त्यानंतर एक महिन्यानंतर प्रशिक्षणार्थीरंना परिपाठातून तुमच्यामध्ये झालेले बदल ह्याविषयी प्रश्नावली देण्यात आली. त्या आधारे

**निष्कर्ष :-**

1. परिपाठ विभाग प्रमुख यांनी परिपाठाचे महत्तव जाणून ते प्रशिक्षणार्थींना समजून सांगून कार्यवाही बदल सखोल आणि विकासात्मक नियोजन केले आहे. ही बाब अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.
2. परिपाठ विभाग प्रमुखांनी परिपाठासंबंधी गरज, महत्तव आणि परिपाठातील महत्त्वपूर्ण घटकांची विस्तृत माहिती प्रशिक्षणार्थींना प्रथम दिली. यामुळे प्रशिक्षणार्थींच्यामध्ये परिपाठाचे महत्तव वाढीस लागले.
3. परिपाठ विभाग प्रमुख आणि संशोधक प्रत्यक्ष सहभागातून प्रशिक्षणार्थी उपस्थिती आणि परिपाठातील सहभाग यामध्ये हळूहळू विकास झालेला दिसून आला असे स्पष्ट केले. हा बदल सकारात्मक होता ही बाब चांगली आहे.
4. प्रशिक्षणार्थी प्रश्नावलीव्दारे परिपाठाचे महत्तव, प्रत्यक्ष सहभाग तसेच सहकार्य, वक्तशीरपणा, निटनेटकेपणा, स्वच्छता, फलक लेखन कौशल्य, वाचन कौशल्य इ. मूल्यांचा विकास झाला असे जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थींना सांगितले.
5. महाविद्यालयामध्ये प्रशिक्षणार्थींच्या विकासासाठी सातत्याने विविध प्रयत्न केले जातात. ही बाब ही निरीक्षणातून स्पष्ट होते तसेच ह्यामध्ये परिपाठ विभागाचे कार्य ही समाधानकारक आहे.
6. परिपाठामध्ये बातम्यांचे वाचन, दिनविशेष, प्रार्थना, बोधकथा, पर्यावरणीय महत्तवपूर्ण घटना, मौन, ध्यानधारणा इ. विविध घटकांच्या आधारे आयोजन केले आहे. यामध्ये सातत्याने विविधता असते. तसेच विद्यार्थी उपस्थिती, गणवेश, नीटनेटकेपणा, स्त्री-पुरुष समानता इ. बाबींचा विचार केला जातो. ही बाब उल्लेखनीय आहे. ह्या वैविध्यपूर्ण परिपाठ कार्यक्रमांव्दारे निश्चितच प्रशिक्षणार्थींच्या विकासाचा विचार केला जातो.

**शिफारशी :-**

1. परिपाठाचे दैनंदिन नियोजन केले जाते ह्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास ते अधिक परिणामकारक होण्यास मदत होईल.
2. परिपाठात विभाग प्रमुखांच्या उपस्थिती बरोबरच सर्व प्राध्यापकांची उपस्थितीचा समावेश केल्यास परिपाठाची व्याप्ती वाढेल तसेच त्याचा सकारात्मक परिणाम प्रशिक्षणार्थींवर झालेला दिसून येईल.
3. परिपाठाचे नियोजन करताना प्रशिक्षणार्थींचा सहभाग ही घ्यावा तसेच त्यांनाही नियोजन कार्य करण्याची जबाबदारी सोपवावी.

4. परिपाठात धार्मिक बाबी येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याचबरोबर स्त्री-पुरुष समानता हे मूल्य रुजविण्यासाठी जास्तीत-जास्त प्रयत्न करावे.
5. परिपाठात कधी-कधी नियोजनपूर्वक तज्ज्ञ व्यक्तींना त्यांचा सहभाग घ्यावा त्यामुळे प्रशिक्षणार्थींना प्रेरणा मिळेल.

अशाप्रकारे परिपाठ ह्या घटकांची बदलत्या काळात अत्यंत गरज असून बी.एड् प्रशिक्षणार्थीच्या मध्ये त्याची रुजवणूक केल्यास ते निश्चितपणे आपल्या विद्यार्थ्यांवर त्याची रुजवणूक करतील. याचा परिणाम आपणांस शांततेकडे घेवून जाणारा असेल.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1. इनामदार वि. द. शालेय परिपाठ
2. भापकर पुरषोत्तम, माझा शालेय परिपाठ 2015, जनरिक प्रकाशन
3. मुळे, उमाठे शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे
4. लिमये क्षमा, मूल्यशिक्षण 2018, विद्याविकास प्रकाशक
5. **www.google.co.in**